पुढारी

# शिवाजी विद्यापीठात वाचक प्रशिक्षण कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रामार्फत विद्यापीठातील सर्व शिक्षक व संशोधक विद्यार्थ्यांसाठी 'रिसोर्सेस फ्रॉम केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस व प्रोक्वेस्ट पब्लिशिंग' या विषयावर एक दिवसीय वाचक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पी. डी. राऊत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नमिता खोत यांनी केले. सूत्रसंचालन भाग्यश्री गुरव यांनी तर आभार डॉ. डी. बी. सुतार यांनी मानले. यावेळी राजेंद्र हिवाळे, सचिन मोरे आदींसह कर्मचारी, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागातील सर्व शिक्षक, इतर अधिविभागातील शिक्षक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

# इंदिरा गांधी, सरदार पटेल यांना अभिवादन

कोल्हापूर : भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी आणि माजी उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवारी आदरांजली वाहण्यात आली. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत या नेत्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन केले.

सकाळ

# ‘विलिंग्डन’मध्ये युवा महोत्सवाची धमाल

## आज समारोप; विजेतेपदाबाबत उत्सुकता, मोठा प्रतिसाद

सांगली, ता. १ : सुगम गायन, समूहगायन, लघुनाट्य, एकांकिका, वक्तृत्व, पथनाट्य या कलाप्रकारांनी काल विलिंग्डनच्या कँपसमध्ये मध्यवर्ती युवा महोत्सवास सुरवात झाली. युवा कलाकारांनी एकेक प्रकारात कौशल्य दाखवत महोत्सवात पहिल्याच दिवशी रंग भरला. त्यामुळे महोत्सवाचा अनोखाच माहौल निर्माण झाला आहे. यानिमित्ताने सांगलीकरांना विविध कलाप्रकारांचा आस्वाद घेण्याची संधी मिळाली आहे. आज दुसऱ्या दिवशीही प्रचंड उत्साह होता. उद्या (ता. २) पारितोषिक वितरण होईल. त्यामुळे विजेतेपद कोणते महाविद्यालय पटकावणार? याची उत्सुकता लागली आहे.



सांगली : मध्यवर्ती युवा महोत्सव लोकवाद्यवृंद प्रकारात जोशात उडी घेऊन हालगी वाजवताना युवा कलाकार आणि त्याला साथ देताना सहकारी.


शिवाजी विद्यापीठाचा ३८ वा मध्यवर्ती युवा महोत्सव काल विलिंग्डन महाविद्यालयात सुरू झाला. सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतून आलेल्या ९० महाविद्यालयांतील युवक-युवतींनी हजेरी लावली आहे. विविध ठिकाणी कलाप्रकारांची स्पर्धा रंगली आहे. कँपसमधील खुला रंगमंच, वेलणकर सभागृह, कांतिलाल शहा प्रशाला, अप्लाईड सायन्सेस इमारत आणि महाविद्यालय परिसरात विविध कलाप्रकार पाहण्यासाठी महाविद्यालयीन युवक-युवतींसह रसिकांनी गर्दी केली आहे. बुधवार (ता. ३१) सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारी पथनाट्ये तिन्ही जिल्ह्यांतील संघांनी सादर केली. पथनाट्याचा विषय रसिकांना आणि परीक्षकांना पटवून देण्यासाठी कलाकौशल्य पणाला लावल्याचे दिसले. खुल्या रंगमंचावर सुगमगायन, समूहगायन लघुनाट्य व मूकनाट्यचे सादरीकरण झाले. कांतिलाल प्रशालेत लोकवाद्यवृंद आणि लोककलांचे सादरीकरण केले. वक्तृत्व स्पर्धेत सामाजिक प्रश्नांवर परखडपणे विचार मांडले. मातीकाम, सांघिक रचनाकृती, वादविवाद स्पर्धांना प्रतिसाद मिळाला.






**आज महोत्सवात**

- सकाळी १० वाजता : एकपात्री अभिनय, प्रश्नमंजुषा, स्पॉट फोटोग्राफी, स्थळचित्रण
- दुपारी ४ वाजता : पारितोषिक वितरण



महोत्सवात पाश्चिमात्य वाद्याचे सादरीकरण केले.

"युवा महोत्सवाच्या माध्यमातून इतर महाविद्यालयातील तरुणांचे विचार, त्यांची कला जवळून पाहण्याचा अनुभव घेता आला. अनेक नवीन कलांचा प्रथमच आस्वाद घेता आला.

- ऐश्वर्या पाटील, सांगली

"महोत्सवातून तयार झालेल्या, पण आता विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या कलाकारांना भेटण्याची संधी मिळाली. एकाचवेळी विविध कला पाहण्याचा अनुभव अविस्मरणीय होता.

- सुरेश बनसोडे, कोल्हापूर

# महोत्सवातून मिळाली करिअरची दिशा

## नवे कलाकार घडले; आत्मविश्वास वाढला

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** विद्यार्थ्यांमधील नृत्य, नाट्य, संगीत अशा विविध सुप्त कलागुणांना संधी देणारे हक्काचे व्यासपीठ हे युवा महोत्सव आहे. या महोत्सवातून शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील अनेक विद्यार्थ्यांना करिअरची दिशा मिळाली आहे. महोत्सवामधून घडलेल्या काही नव्या कलाकारांसमवेत 'लोकमत'ने गुरूवारी संवाद साधला.

कोल्हापुरातील शिवाजी पेठेतील श्रेयश मोहिते म्हणाला, २००९ ते २०१६ यादरम्यान मला युवा महोत्सवात सहभागी होता आले. त्यातून मला अभिनय, दिग्दर्शनासह संघ व्यवस्थापनाचे कौशल्य आत्मसात करता आले. आता विविध संघांसाठी प्रशिक्षक म्हणून मी काम करत आहे.

अवधूत जोशी म्हणाला, या महोत्सवातून मला अभिनय सादर करण्यासाठी एक चांगले व्यासपीठ मिळाले. माझा अभिनय विकसित झाला.

सातारा जिल्ह्यातील वाईमधील नितीन शिंदे याने सांगितले की, महाविद्यालयीन शिक्षण घेताना विविध प्रकारची वाद्ये मी वाजवित होतो. मात्र, त्याबाबतचे तंत्र मला युवा महोत्सवातून शिकायला मिळाले. विविध व्यावसायिक कार्यक्रमात मी सध्या वादक आणि नृत्यदिग्दर्शक म्हणून काम करत आहे.

सवादे (ता. कऱ्हाड) मधील जयंत सुतार म्हणाला, एकांकिका, लघुनाटिकेच्या माध्यमातून महोत्सवात सहभागी झालो. या महोत्सवाने आत्मविश्वास वाढविला. एका मालिकेमध्ये मी काम करत आहे.

साताऱ्यातील शेखर सावंत म्हणाला, महाविद्यालयाच्या प्रथम वर्षात असताना पथनाट्य करत होतो. मात्र, खरी संधी मिळाली ती युवा महोत्सवामध्ये. या महोत्सवाने माझे करिअर घडविले. सध्या नृत्यदिग्दर्शक, मालिका आणि चित्रपटांच्या स्थिर चित्रणाचे काम करत आहे.

युवा महोत्सवाचा आज समारोप; तरुणाई रंगली

# कलेच्या तुफानाला उधाण

संतोष मिठारी/ शरद जाधव।
लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** जोशपूर्ण लोकनृत्य, ठेका धरायला लावणारे पाश्चिमात्य समूहगीत, शास्त्रीय नृत्याचा पदन्यास, सूरमयी शास्त्रीय गायन अशा विविधांगी प्रकारातील कलेच्या तुफानाला गुरूवारी सांगलीमध्ये उधाण आले. तरूणाईच्या कलाविष्काराने रंगलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या या ३८ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा आज, शुक्रवारी समारोप होणार आहे.

विलिंग्डन महाविद्यालयाच्या परिसरातील या मध्यवर्ती महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाची सुरूवात सकाळी दहा वाजता पाश्चिमात्य एकल गायन, वादनाने झाली. महाविद्यालयाने शताब्दी वर्षानिमित्त सकाळी अकरा वाजता ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांचे व्याख्यान घेतले. त्यामुळे महोत्सवातील विविध स्पर्धा काहीवेळ स्थगित केल्या. दुपारी एकच्या सुमारास या स्पर्धा पुन्हा सुरु करण्यात आल्या. खुल्या रंगमंचावर शास्त्रीय तालवाद्य स्पर्धेत तबला, मृदंगावर हार्मोनिअम, सारंगीचा लेहरा घेत पेशकारा, रेला, कायदा, चक्रधर प्रकार स्पर्धकांनी सादर केले. दुपारी तीननंतर या मंचावर शास्त्रीय सूरवाद्य स्पर्धेत हार्मोनिअम, व्हायोलीन, सतार, बासरीच्या वादनातून कर्णमधुर सूर उमटले. वेलणकर हॉलमधील शास्त्रीय नृत्यातून महिषासूरमर्दिनी, देवी पार्वती, विष्णू आदी देव-देवतांचा महिमा उलगडला.

शास्त्रीय गायनातील विविध रागांतून स्पर्धकांनी स्वरांची मांडणी केली. यावर्षी पहिल्यांदाच महोत्सवात सहभागी केलेल्या मेहंदीची स्पर्धा प्राणीशास्त्र विभागात झाली. त्यात डोलीबारात, अरेबिक, बँगल ज्वेलरी, मोरक्कन, लेस ग्लोज प्रकारातील मेहंदी स्पर्धकांच्या हातावर रंगली. राजकारण, वाहतूक नियंत्रणाबाबत व्यंगचित्रातून वास्तव मांडण्यात आले. सप्तरंगी रांगोळीतून व्यक्तिचित्रण, निसर्ग रेखाटण्यात आला. कांतिलाल शाळेच्या परिसरातील रंगमंचावर पाश्चिमात्य समूहगीताने उपस्थितांना ठेका धरायला लावला.

सायंकाळनंतर या रंगमंच परिसरातील गर्दी वाढली. शेतकरी, धनगरी, कोळीनृत्य, लावणी, वाघ्या-मुरळी आदी प्रकारांतील लोकनृत्य स्पर्धकांनी जोशपूर्ण वातावरणात सादर केले. टाळ्या, शिट्ट्यांचा गजर, नृत्याचा फेर धरत तरूणाईने लोकनृत्याचा आनंद लुटला.






१) सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयातील शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात गुरूवारी व्यंगचित्रांच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्नांचा वेध स्पर्धकांनी घेतला. २) युवा महोत्सवात नव्यानेच समावेश झालेल्या मेहंदी प्रकारात कला सादर करताना तरुणींमध्ये उत्साह दिसून आला.



मध्यवर्ती युवा महोत्सवात गुरुवारी विद्यार्थिनीने शास्त्रीय नृत्य सादर केले.

सर्व छायाचित्रे : नंदकिशोर वाघमारे





१)शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात स्पर्धकांनी सप्तरंगी रांगोळीतून व्यक्तिचित्रण, निसर्ग रेखाटली. २) महोत्सवात विद्यार्थ्यांनी पाश्चिमात्य समूहगीताचे सादरीकरण केले.